दै. गोदातीर दि. 10/06/2024

# अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर धाड



**नरसी-** रामतिर्थ पोलिसांनी हिप्परगामाळ येथे अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यावर धाड टाकली. या धाडीत ४८ देशी दारूच्या बॉटलसह एकास ताब्यात घेण्यात आले आहे.

नरसी पासून जवळ असलेल्या हिप्परगामाळ ता. बिलोली येथे काही दिवसांपासून गावातील एक व्यक्ती देशी दारूची अवैधरित्या विक्री करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यावरून रामतीर्थ ठाण्याचे स.पो.नि. श्रीधर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि शिवराज नरवाडे, पोहेकॉ संजय शिंदे, पोकॉ आणिल रिंदकवाले, प्रकाश बेळीकर, पोहेकॉ पुंडलिक आलेवाड, जयश्री जाधव, पोलीस पाटील यांनी हिप्परगीमाळ येथे एका घरावर धाड टाकून अवैध देशी दारू करताना बाबु संभाजी डाकोरे यास ताब्यात घेऊन १८० एमएलच्या ४८ बॉटलस जप्त केल्या.

या प्रकरणी बाबु डाकोरे याच्या विरुद्ध रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

→ दै. प्रजावाणी

# अवैध ऑनलाइन जुगारअड्ड्यावर लोहा पोलिसांचा छापा, १८ हजारांचा मुद्देमाल जप्त



लोहा, वार्ताहर, दि. १० : लोहा शहरात खुलेआम मटका व गुडगुडी ऑनलाइन जुगार खेळविला जात होता. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिनिअर पोलीस उपनिरीक्षक एस. जी. निवळे यांच्या पथकाने धाड टाकली. यात अवैध ऑनलाइन जुगार अड्ड्यातील कम्प्युटर, टीव्ही, मॉनिटर, कीबोर्ड, चार्ट असा जवळपास १८ हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. एकास अटक केली. या कार्यवाहीमुळे मटका-गुडगुडीवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

लोह्यात मटका खुलेआम सुरू आहे बसस्थानक व परिसरात बुक्या आहेत तसेच ऑनलाइन अवैध जुगार गुडगुडी सुरू असल्याची माहिती पोलिसांना समजली. पोनि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिनिअर पोउपनि. एस. जी. निवळे, पोलीस अंमलदार डफडे, राठोड यांनी गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून धाड टाकली. या धाडीमध्ये पोलिसांनी १८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. एकास अटक केली. यात एक मॉनिटर, कीबोर्ड, माऊस, चार्ट, जुगाराचे इतर साहित्य व चिट्ट्या मिळून आल्या. या प्रकरणी लोहा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.